ठाणे, बुधवार दि. १७ जुलै २०२४ | वर्ष : १३, अंक : ८० , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र समाट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल ।
करावा विठ्ठल, जीवभाव ।।

अग्रलेख

## देशविकासाचे प्रश्न

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही काही मोजक्या नागरिकांनाच आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती असावी, हे देशाचे दुर्दैव असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायधीश एन. व्ही. रमण यांनी ४ वर्षांपूर्वी व्यक्त केले होते.

......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,६४० | ९५,२०० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्या पक्षात वादग्रस्त हिरॉईन घेतली पाहिजे. त्यानिमित्त का होईना पक्षाला लोकप्रियता मिळेल.

# ठाण्यात अवतरली अवघी पंढरी

## ठाण्यात दिंडीची पर्वणी

**ठाणे – महाराष्ट्राचे वैभव असलेली विठूरायाची पंढरी आणि पारंपरिक सांस्कृतिक वारी आणि त्याचा वारसा हा ठाणे जिल्ह्यात जतन केला जातो आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने ठाण्यात अवघी पंढरी अवतरलेली असल्याचे चित्र पाहायला मिळाले. तर हा वारसा ठाण्यातील शाळांनीही जपला असुन आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला वारकरी बनलेल्या शाळकऱ्यानी पारंपारिक वेषात दिंडी काढून विठू नामाचा गजर केला. सुदैवाने वरूणराजानेही उसंत घेत दिंडी सोहळ्याच्या उत्सवाला हातभार लावल्याने साग्रसंगीत दिंडीमध्ये सहभागी बालचमुचा उत्साह दुणावलेला दिसून आला. तर ठाण्यात मनसेच्या वतीने विनायक नलावडे यांनी विनाशुल्क गडकरी रंगायतनमध्ये वारी पंढरीची हा सुमधुर अभंग गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात बाल कलाकारांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथील उत्सवाची अनुभूती ठाणेकरांना मिळावी तसेच आपली परंपरा व संस्कृती शालेय वयातच विद्यार्थ्यांना कळावी. यासाठी ठाण्यातील शाळांनी दिंडी सोहळे आयोजित केले होते. ठाणे पूर्वे कडील कोपरी येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटी, इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनीही बहारदार दिंडी यात्रा काढली. मुख्याध्यापिका भारती यादव, वृषाली नाचणे, शिक्षक राजेश पवार आणि मैमुना खान यांच्या (पान २ वर)



ठाणे पूर्व येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त भव्य दिव्य दिंडी काढण्यात आली होती यामध्ये शाळेतील मुले विठ्ठल रुक्मिणी,संत,वारकरी आदींची वेशभूषा करून पारंपरिक वेशात मुलांनी लेझीम द्वारे रिंगण केले. (छाया, मनोज सिंह)




# पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी

वारंकऱ्यांसाठी विशेष ट्रेन | पंढरपूरात आषाढीसाठी १२ लाखांहून अधिक भाविक | मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा

पंढरपूर : ज्या दिवसाची वाट गेले काही दिवस वारकरी बघत होते.तो सोनियाचा दिन आला आहे. दशमीला म्हणजे मंगळवारी पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी फ्व्यास मिळाली. यंदा विक्रमी भाविकांची गर्दी ,टाळ मृदुंगाचा जयघोष,भजन,हरिनामाचा गजराने पंढरी नगरी दुमदुमून निघाली आहे. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन घेण्यास भाविकांना २० ते २२ तास लागत आहे. यंदा अनेक सोयी सुविधा रांगेत असल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, उद्या म्हणजे बुधवारी आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा एकादशी. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विठ्ठलाची शासकीय महापूजा करणार आहेत. पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे या अभंगा प्रमाणे लाखो भाविक पंढरीला आषाढी सोहळ्यासाठी दाखल झाले आहेत. एस टी, जादा रेल्वे तसेच खासगी वाहनातून भाविक मोठ्या संख्यने येत आहेत. त्याच बरोबरीने संतांच्या पालख्या सोबत देखील मोठ्या संख्येने भाविक आहेत. (पान २ वर)

## विठ्ठल भक्तांसाठी भाजपकडून विशेष ट्रेन

मुंबई – पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी भाजपाच्यावतीने नमो एक्स्प्रेस सोडण्यात आली. मंगलप्रभात लोढा आणि आशिष शेलार यांनी पुढाकार घेऊन ही व्यवस्था केली आहे. वारी हा मराठी माणसाचा सांस्कृतिक अभिमान आहे, अध्यात्मिक अभिमान आहे. ज्या वारकरी पंथाने भागवत ध्वजाची पताका शेकडो वर्षे उंच ठेवली त्या भागवत धर्माचा सर्वात मोठा मेळा हा पंढरीला पाहण्यास मिळतो. विठुमाऊलीच्या दर्शनासाठी आसुसलेला वारकरी हा कशाही पद्धतीने पंढरपूरमध्ये पोहचण्याचा प्रयत्न करतो. त्याचप्रमाणे मुंबईतला जो वारकरी आहे जो कुठे नोकरी (पान





## पंढरपुरात भाविकांना पोटभर जेवण

आषाढी यात्रेसाठी आलेल्या संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यांसह शेकडो पालख्या आणि दिंड्यांनी पंढरपूर तालुक्यात प्रवेश केला आहे, त्यामुळे दर्शनासाठी गर्दी वाढत आहे. दसमी, एकादशी व द्वादशीला लाखोंच्या संख्येने भाविक पंढरपुरात दाखल झालेले असतात. हे भाविक भुकेले राहू नयेत, त्यांना भोजन मिळावे, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मोफत अन्नदान करण्यात येत आहे, तर मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगेतील भाविकांना मोफत अन्नदान, (पान २ वर)

### मुख्यमंत्र्यांकडून पंचपक्वान्न...

मुख्यमंत्र्यांकडून जास्तीत जास्त भाविकांना भोजनाचा लाभ मिळावा यासाठी या आषाढी वारीत चंद्रभागा बसस्थानक, पालखी मार्गावर व नवीन भक्त निवासासमोर अन्नदान केंद्र उभारण्यात आले आहे. १६ ते १८ जुलैपर्यंत हे मोफत भोजन वाटप होणार आहे. यात पाणी बाटली, सरबत बाटली आणि पंचपक्वान्न भोजन देण्यात येणार आहे.

थोडक्यात घडामोडी

## अटाळी गावातील आगरीकोळी शिल्पाचे व सिमेंट काँक्रिट रस्त्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडून लोकार्पण

कल्याण पश्चिम मतदारसंघातील अटाळी गावात उभारण्यात आलेल्या आगरी कोळी समाजाच्या शिल्पाचे लोकार्पण करण्यासह आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडून येथील मुख्य रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटच्या कामाचे भूमीपुजनही करण्यात आले. अटाळी गावामध्ये राहणाऱ्या ग्रामस्थांनी समाजाचे प्रतिक म्हणून हे शिल्प उभारण्याची मागणी केली होती. त्याला आमदार विश्वनाथ भोईर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लगेचच त्यासाठी २५ लाखांचा निधी मंजूर केला. तर सध्याच्या बदलत्या काळात आणि विकासाच्या ओघात आपली शहरे बदलत असून आगरी कोळी समाजाचा ठसा असणारी गावखेडीही नामशेष होत चालली आहेत. अशा परिस्थितीत अटाळी गावामध्ये उभारण्यात आलेले हे शिल्प आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची साक्ष येणाऱ्या पिढीला देतील असा विश्वास यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी व्यक्त केला.

**मुख्य रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटच्या कामाचेही भूमीपूजन** – दरम्यान यावेळी अटाळी गावातील मुख्य रस्त्याच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या कामाचेही आमदार विश्वनाथ भोईर यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले. अटाळी गावातील हनुमान मंदिर ते नारायण पाटील निवासापर्यंत हा सिमेंट काँक्रीटचा रस्ता बनवण्यात येणार आहे. अटाळी गावातील हा (पान २ वर)

# जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शिकाऊ उमेदवारांना निवड पत्र वाटप




(छाया–अशोक घाग)

ठाणे – जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत दि. १५ जुलै रोजी शिकाऊ उमेदवारी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यींना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सदिच्छा दिल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते याच्या हस्ते उमेदवारांना निवड पत्र देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. कुशल काम असो, रोजगार असो किंवा उद्योजकता कामात उत्तम कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्य असते. तरुणांनी आत्मसात केलेले कौशल्य अधोरेखित करण्यासाठी आणि काळानुसार ते अधिक कुशल होण्यासाठी प्रयत्नशील असणे ही काळाची गरज आहे. जागतिक युवा कौशल्य दिन २०२४ ची थीम शांतता आणि विकासासाठी युवकांची कौशल्य (USE SKILL FOR PIECE AND DEVELOPMENT) अशी असून यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा असे मार्गदर्शन यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी केले. त्यावेळी ठाणे (पान २ वर)




पालिका मुख्यालयासमोर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

# दोन ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

## श्रमजीवी कामगार रयत संघटनाची मागणी

ठाणे – फायलेरिया विभागातील कामगारांचा दोन महिन्यापासून पगार न देणे, मेट्रोच्या कामातून ठेकेदाराने ५५ कर्मचारी कमी केले वारंवार पत्रव्यवहार केल्यानंतरही कुठलाच न्याय मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांनी मंगळवारी थेट पालिका मुख्यालयासमोर धरणे आंदोलन करीत ठिय्या मांडला.

मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदारकडे कार्यरत असलेल्या सुमारे ५५ कामगारांना कामावरून कमी करण्याच्या बेकायदेशीर कारवाईच्या निषेधार्थ कामगारांनी आज ठाणे महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, या मध्ये जानेवारी २०२० पासून वार्षिक रजेचा पगार न देणे ,फायलेरिया विभागातील कामगारांचा दोन महिन्यापासून पगार न देणे, या बद्दल वारंवार पत्रव्यवहार पाठपुरावा करून सुद्धा न्याय मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव श्रमजीवी कामगार रयत संघटनेच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन छेडण्यात आले.

तसेच ठेकेदारांकडून आरोग्यासाठी सवलत असणारी ईसीएस सेवा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे कचरा वाहतूक कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहला आहे. त्याचप्रमाणे ठाणे शहराला डायघर येथील डम्पिंग ग्राऊंड बंद झाल्यामुळे मुंब्रा, दिवा व ठाण्याच्या गाड्या वागळे, सी. पी. तलाव येथे सर्व कचरा वाहतूक गाड्या खाली करण्यात येतात.व येथे एक गाडी खाली होण्यासाइी ११ ते १२ तास लागत असल्यामुळे कामगारांना उशिरापर्यंत थांबावे लागते. (पान २ वर)

# पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांच्या बसवर काळाचा घाला; ५ जण दगावले

नवी मुंबई : मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात झाला आहे. डोंबिवलीवरून पंढरपूरला जाणाऱ्या ट्रॅव्हल्सचा अपघात झाला आहे. या ट्रॅव्हल्समधून एकूण ५४ वारकरी प्रवास करत होते. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असून ८ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तसेच, २० ते ३० प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे.



विठ्ठलाच्या नामघोषात आषाढी एकादशीसाठी पालख्या पंढरीकडे मार्गक्रमण करत आहेत. अनेक पालख्या पंढरपुरात दाखल झाल्या असून काही पालख्या आज रात्रीपर्यंत पंढरपुरात (पान २ वर)

## कल्याणमधील पाणी समस्येबाबत मनसे आक्रमक केडीएमसी कार्यालयात मडके फोडत, अधिकाऱ्यांना दिले गाजर

कल्याण – कल्याण पश्चिमेकडील बारावे गाव ,गौरी पाडा परिसरात पाणी समस्या भेडसावत असून पाणी कमी दाबाने ,अनियमित होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त आहेत .केडीएमसीला अनेकदा निवेदने तक्रारी करून देखील पाणी समस्या जैसे थे असल्याने आज मनसेने केडीएमसी च्या ब प्रभाग कार्यलयात हंडा मोर्चा काढला होता .यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी कार्यलयातच मडके फोडले तसेच अधिकाऱ्याना गाजर आणि फेअर अँड लवली भेट देत स्मार्ट होण्याचा उपहासात्मक सल्ला दिला .लवकरात लवकर पाणी समस्या सोडवा अन्यथा याहीपेक्षा उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला.

## मुख्यमंत्र्यांची एमजीएम हॉस्पिटलमधील जखमींची विचार पूस, मृतकांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर



डोंबिवली ग्रामीण येथून पंढरपूरला निघालेल्या भाविकांच्या बसच्या अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांची पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात जाऊन मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. सर्वांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांच्यावर सुरु असलेल्या उपचारांची डॉक्टरांकडून माहिती घेतली. यासोबतच या दुर्घटनेत जीव गमवावा लागलेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली. तर जखमी झालेल्यांवर शासकीय खर्चाने उपचार करण्यात येतील असेही स्पष्ट केले. तसेच द्रुतगती महामार्गावर ट्रॅक्टर कसा आला याचीही चौकशी करण्याचे निर्देशही दिले. यावेळी एमजीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता, डॉक्टर्स, शिवसेनेचे डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, संतोष चव्हाण, शिवसेनेचे पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण उपस्थित होते.

# आता झोमॅटो, स्विगीवरून खाद्यपदार्थ मागवणं महागणार

**मुंबई : आजकाल ऑलाईन पद्धतीने जेवण मागवण्याचे प्रमाण चांगलेच वाढले आहे. जेवण बनवण्याचा कंटाळा आला की लगेच हातातील मोबाईलच्या मदतीने जेवणाची ऑर्डर दिली जाते. झोमॅटो आणि स्विगी या ऑनलाईन जेवणाच्या ऑर्डर पुरवणाऱ्या दिग्गज कंपन्या आहेत. या क्षेत्रात या दोन कंपन्यांची मक्तेदारी आहे. दरम्यान, एका झटक्यात ऑनलाईन फूड ऑर्डर करणं चांगलंच महागणार आहे. कारण झोमॅटो आणि स्वीगी या दोन्ही फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म्सने आपले डिलिव्हरी चार्चेस तब्बल २० टक्क्यांनी वाढवले आहेत. या निर्णयामुळे आता ऑनलाईन फूड मागवणाऱ्यांच्या खिशाला झळ बसणार आहे.**

### खाद्यपदार्थ ऑर्डर करणे महागणार

स्वीगी आणि झोमॅटो या दोन्ही प्लॅटफॉर्मवरून खाद्यपदार्थ ऑर्डर करणे आता महागणार आहे. कारण या दोन्ही कंपन्यांनी प्रत्येक ऑर्डरसाठीचे चार्जेस २० टक्क्यांनी वाढवले आहेत. आता या दोन्ही कंपन्या प्रत्येक ऑर्डसाठी सहा रुपये घेणार आहेत. याआधी प्रत्येक ऑर्डरसाठी या दोन्ही कंपन्या पाच रुपये घ्यायच्या. वाढीव चार्जेस बंगळुरू, दिल्ली या ठिकाणी सध्या हा निर्णय लागू केला जाणार आहे.

**चार्जेसमध्ये 20% वाढ!**




### प्लॅटफॉर्म फी म्हणजे नेमकं काय?

स्विगी आणि झोमॅटो या दोन्ही कंपन्यांनी गेल्या वर्षापासून प्लॅटफॉर्म फी घेणं चालू केलं आहे. ही फ्लॅटफॉर्म फी अगोदर दोन रुपये होती. प्लॅटफॉर्म फी अशा कंपन्यांसाठी गरजेची आहे. नफा वाढवण्यासाठी ही फी आकारली जाते. प्रत्येक ऑर्डवर घेतले जाणारे चार्जेस म्हणजेच प्लॅटफॉर्म फी आहे.


### प्लॅटफॉर्म फी वाढवण्याचं नेमकं कारण काय?

स्विगी आणि झोमॅटोकडून नफावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या कंपन्यांनी आपल्या प्लॅटफॉर्म फीमध्ये वाढ केली आहे. जाहिरातीच्या माध्यमातूनही या कंपन्यांना काही प्रमाणात महसूल मिळतो. रेस्टॉरंट्सकडून मिळणाऱ्या कमिशनमध्ये वाढ करण्याची संधी या कंपन्यांना दिसत नाहीये. यामुळेच ग्राहकांकडून घेतल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म फीमध्ये या कंपन्यांनी वाढ केली आहे.

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
महाराष्ट्र सम्राट



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## देशविकासाचे प्रश्न

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही काही मोजक्या नागरिकांनाच आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती असावी, हे देशाचे दुर्दैव असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायधीश एन. व्ही. रमण यांनी ४ वर्षांपूर्वी व्यक्त केले होते. रमन यांच्या मते, देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला आपले संविधानिक अधिकार आणि कर्तव्य माहित असणे आवश्यक आहे. वकील आणि जनतेला घटनात्मक तरतुदी आणि घटना माहित असणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा झाला तरी संविधानिक अधिकारांची आपल्याला जाणीव नाही, ही गंभीर गोष्ट आहे. कायदे किचकट शब्दांत मांडले जातात, असेही दिसते. सोप्या शब्दांत न्यायालयीन निकाल असावेत, अशी अपेक्षाही अनेक विधि तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. तसेच निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांकडून लोकांना मोफत दिल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सुविधा ही एक गंभीर समस्या आहे. तसेच, यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे दिसते. देशात कोणकोणते बदल व्हावेत तसेच देश सुधारला पाहिजे, या दृष्टीने विधी तज्ज्ञ मत मांडत आहेत. सर्वच नेत्यांनी त्यातून धडा घेण्याची गरज आहे.

काही वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते की, काही नेते व राजकीय पक्ष लोकांना आश्वासने देत आहेत. परंतु मोदी यांनीही त्यांचे सरकार केंद्रात असताना दिलेली नेमकी किती आश्वासने होती, याचेही परीक्षण करण्याची गरज आहे. ती आश्वासने पूर्ण झाली आहेत काय, हेही तपासण्याची गरज आहे. निवडून येण्यासाठी राजकीय नेते भरमसाठ आश्वासने देतात, हे योग्य नव्हे. न्यायव्यवस्था व देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांकडून नवीन अपेक्षा व्यक्त होत आहेत, त्या चुकीच्या म्हणता येणार नाहीत, त्या रास्तच आहेत. देशाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला आहे. या दृष्टीने देशात कोणत्या सुधारणा होणे महत्वाचे आहे, यावर विचार झाला पाहिजे. तसे निर्णय विद्यमान सरकारने घेणे आवश्यक आहे. पाश्चात्य देशात एका लहान शाळकरी मुलगाही तिथल्या संविधान आणि कायद्यांबद्दल जागरूक असतो. ही संस्कृती आपल्याकडे असायला हवी. वकील आणि जनतेला घटनात्मक तरतुदी आणि घटना माहित असणे आवश्यक आहे. हे दुर्दैव आहे, की, आपण आता स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी केली, परंतु तरीही शहरी भागातील काही निवडक लोक किंवा कायदेशीर व्यावसायिकांनाच घटनात्मक अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव आहे. लोकांना संविधान काय म्हणते आणि कायद्यांतर्गत कसे अधिकार आहेत, ते वापरायचे कसे, याची माहिती नाही. आपली कर्तव्य काय आहेत, हेही माहिती नाही. हे दुर्दैवी आहे. संविधानसाक्षर व्हा, तरच देश पुढे जाईल. संविधानसाक्षर होण्यासाठी विधि तज्ञानी अपेक्षा व्यक्त केली आहे की, प्रादेशिक भाषांमध्ये न्यायालायाच्या निकालांचे सोप्या पद्धतीने भाषांतर केल्यास आर्थिक भार पडेल. सोप्या शब्दात निकाल असावे तसेच युक्तिवाद हे संक्षिप्त, नेमके आणि लहान वाक्यात लिहिण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा आहे.देशाची अर्थव्यवस्था ढासळत असताना राजकारण्यांनी आश्वासनांची खैरात करणे चिंताजनक आहे. निवडणुका जवळ आल्या की नेतेमंडळी जनतेला मोठ्या प्रमाणावर आश्वासने देत असतात. यामध्ये सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश होतो. वीजबिल माफी, मोफत दिल्या जाणाऱ्या वस्तू वगैरे आश्वासने तर अगदी नेहमीची वाटावी इतकी सर्रासपणे दिली जातात. मात्र, अशा प्रकारे मोफत वस्तू वाटप वगैरे दिल्यामुळे त्याचा देशावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले होते. मोदी यांनी जनतेला दिलेल्या आश्वासनांची आठवण करावी, म्हणजे त्यांना समजेल की, त्यांनी जनतेला केती भरमसाठ आश्वासने दिली आहेत ते ! यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने तत्कालीन न्यायमूर्ती एन. व्ही. रमण यांनी चिंता व्यक्त केली होती. निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांकडून लोकांना मोफत दिल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सुविधा ही एक गंभीर समस्या आहे. तसेच, यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. निवडणुकांच्या काळात अशा प्रकारे राजकीय पक्षांकडून मतदारांना भुलवणाऱ्या घोषणा केल्या जाण्यावर बंदी पाहिजे. राजकीय पक्षांकडून प्रत्येक निवडणुकीत जाहीर करण्यात येणाऱ्या जाहीरनाम्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पावले उचलणे आणि जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांसाठी संबंधित राजकीय पक्षांना जबाबदार धरणे अशी कृती सरकारनेच केली पाहिजे. अशा आश्वासनांवर आणि मोफत वस्तू किंवा सुविधा देण्यावर देशातील विधी तज्ज्ञ नाराजी व्यक्त करत आहेत. न्यायालयाने म्हटले होते की, ही समस्या नाही असे कुणीही म्हणत नाही. ही एक गंभीर समस्या आहे. ज्यांना या वस्तू किंवा सुविधा मिळत आहेत, त्यांना त्या हव्या आहेत. पण दुसरीकडे काहींचे असेही म्हणणे आहे की ते जर कर भरत असतील, तर त्याचा वापर विकासाच्या प्रक्रियेमध्ये केला जावा. त्यामुळे ही एक गंभीर समस्या आहे, असे न्यायालयाने नमूद केले. जनतेला भरमसाठ आश्वासने देणे, अवाजवी सवलती देणे आणि करदात्यांच्या पैशातून उद्योगपतींची कर्ज माफ करणे असले टूकार धंदे आता बंद होणे अपेक्षित आहे. तरच देश पुढे जाईल.



ठाण्यातील इंडो स्कॉट्स ग्लोबल स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विठूरायाची साकारण्यात आलेली सुंदर रांगोळी.....(छाया – मनोज सिंह)

## ठाण्यात आवतरली अवघी पंढरी

**(पान १ वरून)** मार्गदर्शनाखाली निघालेल्या या दिंडी यात्रेत पारंपारिक वेषात विद्यार्थी सहभागी झाले होते. तर साक्षात विठ्ठल–रुक्मिणी साकारून बालकलाकारांनी अभंग आणि टाळ मृदुंगाच्या घोषात विठुनामाचा गजर केला. मुंब्रा येथील समीर ज्ञानप्रसारक विश्वस्त निधी संचालित ज्ञानदीप विद्यामंदिर व ज्ञानदीप कॉनव्हेट स्कूलमध्ये दिंडी सोहळ्याच्या रूपाने अवधी पंढरी अवतरली होती. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सतीश देसाई, सेक्रेटरी समीर देसाई, उपाध्यक्षा शिवानी देसाई, खजिनदार प्रविणा देसाई आदीनी लहानग्यांच्या हस्ते विठुरायाचे पूजन करून पालखी सोहळ्याचा शुभारंभ केला. याप्रसंगी मुख्याध्यापक वासुदेव बऱ्हाटे, मुख्याध्यापिका माधवी कदम, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी पालक सदस्य उपस्थित होते. वारी पंढरीची या कार्यक्रमात मास्टर मेघ पोटे या ११ वर्षीय बालकलाकाराच्या बासरी वादनाने झाली. मेघ याच्या बासरी वादनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर सुप्रसिद्ध गायक पंडित अजित कडकडे यांनी सुश्राव्य अभंग गाऊन प्रेक्षकांचे मन जिंकले. त्यांच्या भाक्तीगीतांमध्ये रसिक चिंब झाले. हा संपूर्ण कार्यक्रम मनसेचे विनायक नलावडे यांनी विनाशुल्क आयोजित केला होता.

## पंढरी नगरीत भक्तांची मांदियाळी

**(पान १ वरून)** आषाढ दशमी म्हणजे मंगळवारी पंढरी नगरीत जवळपास १२ लाखाहून अधिक भाविक दाखल झाले आहेत. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागा भाविकांनी फुल्ल झाली आहे. शहरातील मठ,धर्मशाळा या ठिकाणी भाविक मुक्कामी आहेत. तसेच रस्त्याकडेला राहुट्या, तंबू टाकून भाविक भजन, कीर्तन, हरिनामाचा जयघोष कानी पडत आहे. शहरातील लॉज ,भक्त निवास हे देखील हाऊसफुल्ल झाले आहेत. मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे.चंद्रभागा नदी, वाळवंट भाविकांची गर्दी दिसून येत आहे. नदीचे स्नान,भटक पुंडलिक मंदिराचे दर्शन घेवून भाविक दर्शन रांगेत उभा आहे.

मंदिर समितीने दर्शन रांगेतील भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये म्हणून पत्रा–शेड उभे केले आहेत. या शिवाय आरोग्य, पिण्याचे पाणी, नाष्टा दिला जात आहे. तसेच राज्य सरकारच्या वतीने पिण्याच्या पाण्याची बाटली मोफत वाटप केले जात आहे . दर्शन रांगेत भाविकांना देवाचे थेट दर्शन घेता यावे यासाठी विशेष व्यवस्था केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महारज औसेकर यांनी दिली आहे. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. कोणताही अनुचीत प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तसेच गर्दीच्या ठिकाणी माऊली पथक पोलीस प्रशासनाने तैनात केले आहे. सोमवारी दुपारी चारच्या सुमारास रांगेत उभा होतो. मंगळवारी सकाळी ८ वाजता दर्शन दर्शन झाले. पावसाचा त्रास जाणवला नाही असे हिंगोली जिल्ह्यातील शशी चव्हाण या भाविकाने सांगितले. विठ्ठल मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान, बुधवारी म्हणजे उद्या एकादशीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. असे असले तरी लाखो भक्तांना पाहून विठ्ठल देखील सुखावला असे म्हंटल तर वावगे ठरणार नाही.

## विठ्ठल भक्तांसाठी भाजपकडून विशेष ट्रेन

**(पान १ वरून)** करतो, व्यवसाय करतो, छोटं मोठं काम करतो, त्याच्या मनातही पंढरीची आस आहे. त्याला वाटतं मला जाता येईल का? त्यांच्यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तीर्थक्षेत्रांच्या बाबतीतली योजना ही मुख्यमंत्र्यांनी तयार केली. त्यामागची प्रेरणा हीच आहे की मराठी माणूस किंवा भारतीय माणूस असतो त्याला हे वाटत असतं की आपण आपल्या तीर्थक्षेत्राला गेलं पाहिजे. अशा माता–पित्यांचं मूल होऊन सरकारने व्यवस्था केली आहे असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## पंढरपुरात भाविकांना पोटभर जेवण

**(पान १ वरून)** तर स्वयंसेवी संस्थांच्या वतीनेही मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे देवाच्या दारात कुणीही भुकेला राहणार नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

आषाढी यात्रा सुरू असल्याने श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या दर्शन रांगेत भाविक मोठ्या संख्येने उभे आहेत. या दर्शन रांगेतील भाविकांना मंदिर समितीमार्फत शुद्ध पिण्याचे पाणी, चहा व खिचडी वाटप करण्यात येत आहे. यात भाविकांना गोड बुंदी, खारी बुंदी, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. खिचडी तयार करण्याचे काम श्री संत गजानन महाराज मठ अकोला ही स्वयंसेवी संस्था करत आहे. श्री विठ्ठल–रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी दर्शन रांगेत तासन् तास भाविक उभे राहतात. या भाविकांना जेवणाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. मंदिर समितीकडून दर्शन रांगेत १३ ते २१ जुलैपर्यत २४ तास मोफत खिचडी वाटप करण्यात येत आहे. याचा लाभ लाखो भाविक घेत असून, समाधानही व्यक्त करत आहेत. दासोहरत्न चक्रवती दानेश्वर महाराज, श्री बसवगोपाल नीलमाणिक मठ बंडिगणी मठ बागलकोट (कर्नाटक) या स्वयंसेवी संस्थांच्या वतीने दर्शन रांगेतील पत्राशेड येथे २४ तास भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## दोन ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

**(पान १ वरून)** त्याबदल्यात ओव्हर टाईम सुध्दा दिला जात नाही. तसेच काही बोलल्यास घरी बसविण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे कामगारांना निमुटपणे हा अन्याय सहन करावा लागतो, असे एका कचरावाहक कामगाराने माहिती दिली. कामगाऱ्यांच्या व नागरिकांच्यास आरोग्याशी खेळ मंडणाऱ्या नियमबाह्या ठेकेदार मेट्रो वेस्ट हँडलिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि अरेरावी करणारे बालाजी ट्रान्सपोर्ट या दोन्ही ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी या साठी हे आंदोलन छेडण्यात आले आहे.

## जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त शिकाऊ उमेदवारांना निवड पत्र वाटप

**(पान १ वरून)** त्यावेळी ठाणे आयटीआय चे प्राचार्य स्मिता माने, सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार विजय टिकोले, गंगाराम कर्पे, तसेच गटनिदेशक तृषांत मोटगरे, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार राजेश सोनवणे, निदेशक शर्वरी दुर्गुळे तसेच शिकाऊ उमेदवारी करिता निवड झालेले प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षण घेणारे युवक रोजगार, स्वयंरोजगारासाठी मोलाची भूमिका बजावत असतात. कंपनीसाठी, स्वरोजगरासाठी आवश्यक मनुष्यबळ आयटीआय द्वारे पुरविले जात आहेत. कुशल मनुष्यबळाची गरज आयटीआय प्रशिक्षण पूर्ण करीत आहे, त्यामुळे जागतिक युवा कौशल्य दिनाला आयटीआय करिता प्रचंड महत्त्व आहे असे प्रतिपादन प्राचार्य स्मिता माने यांनी यावेळी केले.

## पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांच्या बसवर काळाचा घाला; ५ जण दगावले

**(पान १ वरून)** दाखल होणार आहेत. अशातच राज्यभरातून अनेक वारकरी आषाढीसाठी पंढरपुराच्या दिशेनं जात आहेत. डोंबिवलीवरुन निघालेल्या अशाच एका वारकऱ्यांच्या ट्रॅव्हल्सला भीषण अपघात झाला आहे.

विठ्ठलाच्या ओढीनं सर्व वारकरी पंढरीच्या दिशेनं निघाले होते. पण वाटेतच त्यांच्यावर काळानं घाला घातला. रात्री एक वाजण्याच्या सुमारास मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरुन ट्रॅव्हल्स पंढरपूरच्या दिशेनं जात असताना भीषण अपघात झाला. वारकऱ्यांच्या ट्रॅव्बल्ससमोर एक ट्रॅक्टर जात होता. ट्रॅव्हल्सवरचा चालकाचा ताबा सुटला आणि पुढे जाणाऱ्या ट्रॅक्टरवर ट्रॅव्हल्स जाऊन आदळली. पुढे ट्रॅव्हल्स अनियंत्रित होऊन थेट ३० ते ४० फूट खड्ड्यात जाऊन पडली. यावेळी ट्रॅव्हल्समध्ये ५४ वारकरी होते. यातील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरील पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तात्काळ बचावकार्य सुरू करण्यात आलं. सर्व जखमींना एमजीएम रूग्णालय आणि पनवेलच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सर्व जखमींवर सध्या उपचार सुरू आहेत. दरम्यान, एक्सप्रेसवेवर ट्रॅक्टरला बंदी असतानाही ट्रॅक्टर एक्सप्रेसवेवर आलाच कसा? पोलीस यंत्रणा कार्यरत नाही का? असा सवाल सध्या उपस्थित होत आहे.

## अटाळी गावातील आगरीकोळी शिल्पाचे व सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडून लोकार्पण

**(पान १ वरून)** मुख्य रस्ता असून तो सिमेंट कॉंक्रीटचा करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली होती. त्यावर आमदार विश्वनाथ भोईर यांनी ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून त्याद्वारे हा सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचे काम केले जाणार आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. तसेच स्थानिक नागरिकांनी यासाठी आमदार विश्वनाथ भोईर यांचे मनापासुन आभार मानले आहेत.



नौपाड्यातील सरस्वती मंदिर ट्रस्टच्या शाळेतील विद्यार्थ्यानी मंगळवारी दिंडी सोहळा साजरा केला. यावेळी शिक्षकवृंद आणि पालकवर्ग उपस्थित होते.माऊलीची पालखी सजवून ढोल ताशा लेझीमसमवेत काढलेल्या पालखी मिरवणूकीत विद्यार्थी वारकरी आणि पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेच्या लाभासाठी अर्ज करावेत

ठाणे – ठाणे जिल्ह्यातील मातंग समाजातील मांग, मातंग, मिनीमादींग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या १२ पोटजातीतील सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, अभियांत्रिकी व वैदयकीय पदवी अभ्यासक्रमांतर्गत ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांकडून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती करिता अर्ज मागविण्यात आले आहेत. जेष्ठता व गुणक्रमांकानुसार जिल्ह्यातील प्रथम ३ ते ५ विद्यार्थ्यास निधीच्या उपलब्धतेनुसार शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला (श्रशर्रींळपस लशीींळषळलरींश), मार्कशिटस, २ फोटो व पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा इत्यादी सह २ प्रतीत अर्ज सादर करावा. अर्जामध्ये स्वतःचा पूर्णपत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा.


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
बेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड, ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक: ACC-II/674/24
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक : श्री राधा माधव संस्था विठ्ठलवाडी
अर्जदार :– श्री. दिलीप सुधीर नबोजा

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त २, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१. श्री. प्रशांत भोलानाथ घोष, २. श्री. श्रीमंतो तुलसी दास, ३. श्री. दिलीप सुधीर नबोजा, ४. श्री. बिमलेंदू अधिकारी, ५. श्री. रोबिन गुलाब करमोकर, ६. श्री. सुशांत गोपाल अधिकारी, ७. श्री. अनिरुध्द दर्पोहरी मन्ना, ८. श्री. सोमेन दत्ता, ९. श्री. सुशांतो बेलेल, १०. श्रीम. मानसी अधिकारी, ११. श्री अनिल धावा, १२. श्रीम. सविता अधिकारी.

**तसेच खालील नमूद विश्वस्तांच्य कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.**

१. श्री. प्रशांत भोलानाथ घोष, २. श्री. श्रीमंतो तुलसी दास, ३. श्री. दिलीप सुधीर नबोजा, ४. श्री. बिमलेंदू अधिकारी, ५. श्री. रोबिन गुलाब करमोकर, ६. श्री. सुशांत गोपाल अधिकारी, ७. श्री. अनिरुध्द दर्पोहरी मन्ना, ८. श्री. सोमेन दत्ता, ९. श्री. सुशांतो बेलेल, १०. श्रीम. मानसी अधिकारी, ११. श्री अनिल धावा, १२. श्रीम. सविता अधिकारी.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२ जुलै २०२४ रोजी दिली.

सही/–

सही/–
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग,
ठाणे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME **FROM DEEPALI UMESH SALUNKHE TO DIPTI UMESH SALUNKHE** AS PER AFFIDAVIT. RESIDING AT E-2/101, GRAND SQUARE, ANAND NAGAR, GHODBUNDER ROAD, THANE WEST – 400615

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र.ब-1/नमुंमपा/शहर अभियंता/ 23 /2024-2025**

**कामाचे नाव :-** तुर्भे विभागातील सानपाडा गाव से.5 येथील नमुंमपा शाळा क्र.116 च्या इमारतीची आतील व बाहेरील रंगकाम व दुरूस्तीची कामे करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 1,43,20,064/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या NIC च्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 17/07/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करावयाचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्पडेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**शहर अभियंता**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/76/2024

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01955/18/24
Inquiry/case No. : ACC/I/544/2024
Name of the Trust : ARYAVART HISTORIC HERITAGE CULTURAL FOUNDATION
**Address of the Trust :** A-7/0,4, SECTOR-8B, CBD BELAPUR, NAVI MUMBAI, THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** MR. MANMOHAN JANVED TOMAR

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 15/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/12434/18/24
Inquiry/case No. : ACC/III/741/2024
Name of the Trust : श्री साई लीला शिक्षण ट्रस्ट–शिळ
**Address of the Trust :** हाऊस नं. २५६६, मु. वागंणी, ता. अंबरनाथ, बदलापूर, ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** श्री. महेश सदाशिव बनोटे.

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/12061/18/24
Inquiry/case No. : ACC/III/563/2024
Name of the Trust : कृपा चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust :** प्रभू दर्शन चाळ, लक्ष्मी नगर, जावसई, अंबरनाथ (प.), ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** श्रीमती. ललिता बाबू मोरे

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/ MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/ इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/

■ जागा : १५२
■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-
■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४
■ वेबसाईट https://mu.ac. in/




## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स - ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे
■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/ EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/ OBC/EWS: ४५%गुण
■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० ज्ञस ८१/८६ सें.मी
■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे
■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

# 'नागरी बेघरांना निवारा' राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची कल्याण डोंबिवली पालिकेस भेट



कल्याण : नागरी बेघरांना निवारा या विषयासंदर्भातील राज्यस्तरीय संनियंत्रण समितीने आज कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस भेट देऊन नागरी बेघरांना निवारा या विषयाशी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली आणि सदर विषयाबाबत महापालिका राबवित असलेल्या कार्यप्रणाली बाबत माहिती घेतली. यावेळी राज्यस्तरीय सनियंत्रण समितीचे अध्यक्ष उज्वल उके, (से. नि.भा.प्र.से), महेश कांबळे समिती सदस्य, शंकर गोरे सह.आयुक्त न.प.प्र.स., नवी मुंबई, डॉ.रवि जाधव राज्य अभियान व्यवस्थापक नवी मुंबई हे प्रत्यक्ष आणि ब्रिजेश आर्य, प्रमिला जरद हे समिती सदस्य व अनिल उगले उप सचिव न.वि. हे ऑनलाईन प्रणालीव्दारे या आढावा बैठकिस उपस्थित होते.

राज्यस्तरीय सनियंत्रण समितीने यावेळी विचारलेल्या विविध प्रश्नांना विभाग प्रमुख समाज विकास यांनी समर्पक व खुलासेवार माहिती दिल्यामुळे सदर समितीच्या सदस्यांनी या विषयाबाबत महापालिकेच्या सुरु असलेल्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी सदर समितीच्या सदस्यांनी कल्याण पश्चिमेकडील तात्पुरत्या स्वरुपात उभालेल्या बेघर निवारा केंद्राला भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली आणि तेथील लाभार्थ्यांशी संवाद साधला. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्गत सुरु असलेले नागरी बेघर निवारा केंद्राबाबत सदर समितीने अत्यंत सकारात्मक अभिप्राय व्यक्त केला असून भविष्यात आणखी निवारा केंद्र महापालिका क्षेत्रात उभारणेबाबत सुचना दिल्या.

या समयी महापालिकेचे अति. आयुक्त - २ धैर्यशील जाधव, विभागप्रमुख (बेघर निवारा) संजय जाधव, सहा.संचालक नगररचना दिशा सावंत, प्र.वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. पुरुषोत्तम टिके, टिकळनगर पोलीस स्टेशन, बाजारपेठ पोलीस स्टेशन तसेच आरपीएफचे पोलीस अधिकारी, वाहतुक विभागाचे पोलिस अधिकारी, महापालिका उपसचिव किशोर शेळके, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, NULMचे व्यवस्थापक भागवत पठारे, समाज विकास विभागचे इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# कापराचे हे औषधी गुणधर्म माहीत आहे का?

रोजच्या जीवनात आपल्या शरीराबद्दल अनेक तक्रारी उद्भवतात. या तक्रारींचे आपल्याच घरात बरेच नैसर्गिक उपाय असतात. त्यापैकीच एक म्हणजे कापूर. कापूर आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतो. कापराचं सेवन करू शकत नाही, पण तुम्ही वरच्या वर त्याचा वापर करू शकता. कापरामध्ये अँटी-इन्फ्लेमेटरी, एनाल्जेसिक, अँटीसेप्टिक आणि अँटी-कन्जेटिव्ह गुणधर्म आहेत, ज्यामुळे ते नैसर्गिक औषधांमध्ये एक स्थान बनवतं. कोणकोणत्या समस्येसाठी तुम्ही कापूर वापरू शकता.

कापूर देवपूजेकरता मर्यादीत राहिलेला नसून त्याचे इतर औषधी फायदे देखील तितकेच आहेत. ते आपण पाहणार आहोत.

■ एखाद्या ठिकाणी भाजले असल्यास त्या ठिकाणी जळजळ होण्यास सुरुवात होते. अशावेळी त्या ठिकाणी कापूर किंवा कापराचे तेल लावावे यांने त्वरित आराम मिळतो.

■ शरीरावर कोठेही खाज सुटली असेल तर कापूर त्यावर फार परिणामकारक ठरू शकतो. नारळाच्या तेलात कापूर मिसळून तो लावला तर खाज लगेच कमी होऊ शकते.

■ केसांच्या अनेक समस्या या कापराच्या वापराने कमी होऊ शकतात. नारळाच्या तेलात कापूर मिसळून रोज केसांना लावले तर केसातील कोंढा कमी होण्यास मदत होते.

■ कापराचे दाहकविरोधी गुणधर्म स्नायूंच्या वेदनांच्या उपचारांमध्ये खूप प्रभावी आहेत. याव्यतिरिक्त वेदनादायक स्नायूंना मालिश करण्यासाठी कापूर तेलाचा वापर केल्यानं त्या भागात रक्तप्रवाह वाढतो. तसंच सांध्यातील वेदनाही दूर होतात. यासाठी तिळाच्या तेलात कापूर मिसळून सांध्याची मालिश करा.

■ छातीत जळजळ आणि खोकला यासारख्या श्वसन रोगांची लक्षणं दूर करण्याची शक्ती कापरात आहे. म्हणूनच घसा आणि छातीवर लागू होणाऱ्या विविध उत्पादनांमध्ये हा एक प्रभावी पदार्थ आहे. एक चमचा बदाम तेलामध्ये ४-५ थेंब आवश्यक कापूर तेल मिसळा आणि छातीवर हळूवारपणे मालिश करा. कापूरचे काही थेंब गरम पाण्यात टाकून आपण त्याची वाफ देखील घेऊ शकता.

# बॉक्सिंगमध्ये भारताला पदक जिंकण्याची आशा, ६ खेळाडूंकडे नजर

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिकला काही दिवस उरले आहेत. फ्रान्सच्या राजधानीत होणाऱ्या या जागतिक क्रीडा मेळाव्यात भारतीय खेळाडूंकडून मोठ्या अपेक्षा आहेत. टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये भारताला ७ पदके जिंकण्यात यश आले होते. ही पदकसंख्या दुहेरी आकड्यापर्यंत नेण्याचे यंदाचे टार्गेट आहे. त्यात बॉक्सर्सची भूमिका महत्त्वाची ठरेल. त्यामुळे सर्वांच्या नजरा बॉक्सिंग स्पर्धे कडेही खिळल्या आहेत. भारतातर्फे या क्रीडा प्रकारात पुरुष आणि महिला खेळाडूंसह एकूण ६ खेळाडू भाग घेत आहेत. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचे २ पुरुष आणि ४ महिला बॉक्सर पदकासाठी विजयी ठोसा लगावण्यास सज्ज आहेत. पुरुष खेळाडूंमध्ये अमित पंघाल (५१ किलो), निशांत देव (७१ किलो) हे चमक दाखवतील. तर महिला बॉक्सरपटूंमध्ये लोव्हलिना बोर्गोहेन (७५ किलो), निखत जरीन (५० किलो), प्रीती पवार (५४ किलो), जस्मिन लॅम्बोरिया (५७ किलो) या प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देतील.

## निखत जरीन

जरीनने २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करून ऑलिम्पिक कोटा जिंकला. तिला थायलंडच्या रक्सत चुथामात विरुद्ध पराभव पत्करावा लागला परंतु पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान निश्चित करण्यासाठी उपांत्य फेरीपर्यंत मजल पुरेशी ठरली होती. २८ वर्षांची जरीन दोन वेळची जागतिक चॅम्पियन आहे. तिने २०२२ आणि २०२३ मध्ये बॉक्सिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सलग दोन सुवर्णपदके जिंकली आहेत. जरीन यावर्षी चांगल्या फॉर्ममध्ये आहे, ज्यामुळे तिच्याकडून ऑलिम्पिक पदकाची आशा आहे. तिने फेब्रुवारीमध्ये बुल्गेरियामध्ये खेळल्या गेलेल्या स्ट्रॅन्डजा मेमोरियल स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. तर गेल्या महिन्यात कझाकिस्तान येथील एलोर्डा चषक बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदकावर नाव कोरले होते.

## प्रीती पवार

प्रिती पवारने आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत कझाकस्तानच्या झैना शेकेरबेकोवा विरुद्ध विजय मिळवून ऑलिम्पिकचे तिकीट मिळवले. उपांत्य फेरीत तिला चीनच्या युआन चांगने पराभूत केले. ज्यामुळे प्रितीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. जागतिक क्रमवारीत ३५व्या क्रमांकावर असलेली प्रिती ऑलिम्पिकमधील भारतीय बॉक्सर्सच्या यादीत सर्वात तरुण खेळाडू आहे.



## लोव्हलिना बोर्गोहेन

लोव्हलिना सध्या जागतिक क्रमवारीत ४ व्या स्थानावर आहे. तिने चेक रिपब्लिकमध्ये नुकत्याच झालेल्या ग्रां प्रिक्स २०२४ मध्ये रौप्य पदक जिंकले. बॉक्सिंग जगतात तिचे नाव लोकप्रिय झाले आहे. तिच्या खात्यात एक ऑलिम्पिक कांस्यपदक आणि तीन जागतिक चॅम्पियनशिप पदके आहेत. पदकांची ही यादी लोव्हलिनाच्या जागतिक स्तरावरील उत्कृष्ट कामगिरीची क्षमता दर्शवते. टोकियो ऑलिम्पिकमध्ये तिने ६९ किलो गटात कांस्यपदक जिंकले होते पण यंदा ती पॅरिसमध्ये ७५ किलो गटाच्या बॉक्सिंग रिंगमध्ये उतरणार आहे. वजनी गट बदलून ती आपल्या पदकाचा रंग बदलण्यात यशस्वी होईल का? याकडे भारतीय चाहत्यांच्या नजरा खिळल्या आहेत.

## अमित पंघाल

अमित पंघालने बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या (BFI) मूल्यमापन प्रणालीमुळे भारतीय बॉक्सिंग संघातील स्थान गमावले होते. त्यामुळे त्याच्यासमोर पॅरिसचे तिकीट मिळवण्यात अनेक अडचणी होत्या. असे असते तरी त्याने आव्हानांना सामोरे जात बँकॉकमधील जागतिक बॉक्सिंग पात्रता स्पर्धेत चीनच्या लिऊ चुआंगचा ५-० असा पराभव केला आणि ऑलिम्पिक कोटा मिळवला. पंघालचे हे दुसरे ऑलिम्पिक आहे. यापूर्वी त्याने टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले. मात्र त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. त्याच्या नावावर कॉमनवेल्थमध्ये रौप्य आणि सुवर्णपदक, जागतिक स्पर्धेत रौप्य, आशियाई स्पर्धेत सुवर्ण, आशियाई स्पर्धेत कांस्य, रौप्य आणि सुवर्णपदक आहे.

## निशांत देव

बँकॉकमधील जागतिक ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत निशांतने पुरुष बॉक्सिंगमध्ये भारतासाठी पहिला कोटा मिळवला. कोटा लढतीत त्याने वासिल सेबोटारीचा ५-० असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या निशांतचे पहिले ऑलिम्पिक पदक मिळवण्याकडे लक्ष असेल. निशांतने २०२३ च्या बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले होते.

## जास्मिन लांबोरिया

जागतिक क्रमवारीत २२ व्या स्थानावर असलेली जास्मिन लांबोरिया ही अलीकडेपर्यंत ऑलिम्पिक पात्रतेच्या रिंगणातही नव्हती. पण जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेने (WADA) परवीन हुडाचे निलंबन केल्यामुळे जास्मिनला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. तिने जूनमध्ये झालेल्या जागतिक बॉक्सिंग पात्रता स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत मालीच्या मरीन कामाराचा पराभव केला आणि संधीचे सोने केले.

## भारताच्या नावावर ऑलिम्पिकमध्ये तीन कांस्यपदके

बॉक्सिंगमध्ये भारताला गेल्या चार ऑलिम्पिकपैकी तीनमध्ये पदक मिळवता आले आहे. यातील शेवटची दोन पदके मेरी कोम आणि लोव्हलिना बोरगोहेन या महिला बॉक्सिंगपटूंनी जिंकली आहेत. यावेळी लोव्हलिनासह निकत जरीनकडून मोठ्या अपेक्षा आहेत. २००८ बीजिंग ऑलिम्पिकमध्ये विजेंद्र कुमारने भारतासाठी बॉक्सिंगमधील पहिले पदक जिंकले होते. त्यावेळी विजेंद्रने पुरुषांच्या ७५ किलो गटात कांस्यपदक जिंकले होते. २०२१ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये महिला बॉक्सिंगचाही समावेश करण्यात आला. त्यावेळी महिला बॉक्सर एमसी मेरी कोमने इतिहास रचत पदकावर नाव कोरले. मेरी कोमनेही कांस्यपदक जिंकले. यानंतर २०१६ मध्ये या स्पर्धेत देशाला एकही पदक मिळाले नाही, मात्र टोकियो ऑलिम्पिकमध्ये लोव्हलिनाने भारताला बॉक्सिंगमध्ये तिसरे पदक मिळवून दिले. मात्र, तिलाही कांस्यपदकावरच समाधान मानावे लागले होते.

## पहिला विजय पाकिस्तानविरुद्ध

१९४८ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये सात भारतीय बॉक्सर प्रथमच रिंगमध्ये उतरले होते, यामध्ये बिनय बोस, जेनी रेमंड, मॅक जोकिम, रॉबर्ट क्रॅन्स्टन, जॉन नटॉल, रॉबिन भट्ट आणि बाबू लाल यांचा समावेश होता. बाबू लालने बँटमवेट प्रकारात पाकिस्तानच्या लन मॉन्टेरोचा पराभव करत ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पहिला सामना जिंकला होता. मात्र, पुढील फेरीत बाबू लाल पराभूत झाले. १९०४ च्या सेंट लुईस (अमेरिका) ऑलिम्पिकमध्ये पहिल्यांदा बॉक्सिंगचा समावेश करण्यात आला. पण १९१२ साली स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे आयोजित ऑलिम्पिकमध्ये बॉक्सिंगला वगळण्यात आले. स्वीडिश कायद्याने या खेळावर बंदी घातली होती. त्यामुळे हा खेळ ऑलिम्पिकचा भाग नव्हता. २०१२ (लंडन)पासून महिला बॉक्सिंग देखील ऑलिम्पिकचा भाग बनले.

# अपघातातील जखमी वारकऱ्यांवर शासन उपचार मोफत करणार : मुख्यमंत्री



नवी मुंबई : डोंबिवली येथील घेसरगाव येथून पंढरपूरकडे खासगी बसने निघालेल्या वारकरी भक्तांचा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या भीषण अपघातातील जखमींची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कळंबोली येथील महात्मा गांधी मिशन रुग्णालयात प्रत्यक्ष भेट घेऊन पाहणी केली. या दुर्घटनेत दुर्दैवाने मृत पावलेल्या वारकऱ्यांच्या कुटूंबीयांना शासनाकडून ५ लाख रुपयांची मदत देण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जखमींची विचारपूस केली तसेच मुख्यमंत्री शिंदे यांनी एमजीएम रुग्णालयातील डॉक्टरांकडून जखमी वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, डोंबिवली येथील घेसरगांव परिसरातील वारकरी भक्त MH-02-FG-9966 या क्रमांकाच्या खासगी बसने पंढरपूरच्या दिशेने जात असतांना १५ जुलै २०२४ रोजी मध्येरात्रीच्यावेळी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कळंबोली पासून काही अंतरावर या खासगी बस आणि बसपुढे चालणाऱ्या ट्रॅक्टरमध्ये भीषण अपघात झाल्याने बस मधील एकूण ५४ वारकऱ्यांपैकी ०३ वारकरी व ट्रॅक्टरमधील ०२ व्यक्ती अशा एकूण ०५ व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, ४६ जखमी वारकऱ्यांवर कळंबोली येथील महात्मा गांधी मीशन रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यापैकी ७ वारकरी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अती दक्षता विभागात उपचार सुरु आहेत. अपघातातील जखमींच्या वैद्यकीय उपचारावरील सर्व खर्च शासन करणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी झालेल्या अपघाताची संपूर्ण चौकशी करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना दिले.

## ठाण्यात उंची मार्गरोधक कोसळला

ठाणे : ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील आराधना सिनेमागृह परिसरातील रस्त्यावर बसविण्यात आलेल्या उंची मार्गरोधकास एका ट्रकने धडक दिल्याने तो खाली कोसळल्याचा प्रकार मंगळवारी दुपारी उघडकीस आला. हा मार्गरोधक एका दुचाकीस्वाराच्या अंगावर पडून तो किरकोळ जखमी झाला आहे. ट्रक चालकाला नागरिकांनी पकड़ून पोलिसांच्या ताब्यात दिले.

ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागात अनेक अरुंद रस्ते आहेत. या रस्त्यांवर अवजड वाहनाने प्रवेश केल्यास कोंडी होते. ही कोंडी टाळण्यासाठी विविध रस्त्यांवर अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला असून त्यासाठी उंची मार्गरोधक बसविण्यात आलेले आहेत. अशाचप्रकारे आराधना सिनेमागृहाच्या परिसरात जाणाऱ्या रस्त्यावर उंची मार्गरोधक बसविण्यात आलेला आहे. या मार्गावरून सोमवारी दुपारी वैभव बाबर हा ट्रक चालक घेऊन जात होता. त्यावेळी त्याने उंची मार्गरोधकाला धडक दिली. यात मार्गरोधक खाली कोसळला. त्यावेळी तेथून जात असलेले अंबादास जाधव हे दुचाकीस्वार जखमी झाले. त्यांना नागरिकांनी खासगी रुग्णालयात नेले. त्यांच्या डोक्याला आणि पाठीला किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेनंतर नागरिकांनी ट्रक चालक बाबर याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभागाने अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने पडलेला उंची मार्गरोधक रस्त्याच्या बाजूला करण्याचे काम सुरू आहे.



### मिरा भाईंदरच्या

# पहिल्या डबलडेकर उड्डाणपुलाचे याच महिन्यात होणार लोकार्पण

भाईंदर : मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील मिरा रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील प्लेझेंट पार्क सिग्नल ते सिल्वर पार्क सिग्नल या नवीन उड्डाण पुलाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. डिव्हायडर, रिफ्लेक्टर, रंगकाम अशी काही कामे येत्या आठवडाभरात पूर्ण होतील. सध्या फिनिशिंगचे काम अंतिम टप्प्यात असून हा उड्डाणपूल आवश्यक ती सगळी कामे पूर्ण करून याच महिन्यात नागरिकांसाठी खुला केला जाईल, अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी आज दिली. मुंबई महानगरातील वरून मेट्रो, खाली उड्डाणपूल असा हा इंट्रीग्रेटेड पूल असून १किलोमीटर लांबीचा आहे. मिरा भाईंदरच्या लाखो वाहन चालकांना याचा मोठा फायदा होणार आहे, असेही आमदार सरनाईक यांनी सांगितले. या उड्डाणपुलाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व्हावे अशी विनंती आमदार सरनाईक यांनी त्यांना केली आहे.

## सुमारे ७५ कोटींचा खर्च करून १ किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात

### असा आहे नवा उड्डाणपूल

प्लेझेंट पार्क सिग्नल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतचा उड्डाणपूल जवळपास पूर्ण झाला आहे. जवळपास १ किलोमीटरचा हा पूल आहे. साधारण १७.५ मीटर रुंदी आहे. तर रॅम्पची रुंदी १९. ५ मीटर इतकी आहे. या उड्डाणपुलाचे काम ९८ टक्के पूर्ण झाले असून लाल रंगाची थीम येथे ठरविण्यात आली आहे. या उड्डाणपुलासाठी जवळपास ७५ कोटींचा खर्च झाला आहे. या उड्डाणपुलामुळे २ मोठे जंक्शन कव्हर झाले आहेत , अशी माहिती आमदार सरनाईक यांनी दिली.

### पहिला डबलडेकर यशस्वी प्रयोग

मुंबई महानगरात हा पहिला मेट्रो इंट्रीग्रेटेड उड्डाणपूल आहे. वर मेट्रो , खाली उड्डाणपूल , आणि त्याखाली सध्याचा रस्ता अशा सुविधा येथे लोकांना मिळतील. मेट्रो मार्गाचे काम याठिकाणी आधी पूर्ण करण्यात आले. त्यानंतर या उड्डाणपुलाचे काम सुरु करण्यात आले. जवळपास दीड वर्षात उड्डाणपुलाचे काम पूर्ण केले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी आमदार सरनाईक यांना यावेळी दिली. या मार्गावर ३ उड्डाणपुलापैकी १ पूर्ण झाला आहे. तर दुसऱ्या उड्डाणपुलाचे काम दिवाळीपूर्वी पूर्ण केले जाईल , असा शब्द अधिकाऱ्यांनी आमदार सरनाईक यांना यावेळी दिला.

### मुख्यमंत्र्यांना लोकार्पण करण्याची विनंती

पुढील एका आठवड्यात उड्डाणपुलाची राहिलेली सगळी कामे पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे. एमएमआरडीएकडून मेट्रो व उड्डाणपुलाचे काम होत आहे. मुख्यमंत्री तसेच या खात्याचे मंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उड्डाणपुलाचे लोकार्पण व्हावे अशी विनंती स्थानिक आमदार म्हणून मी व एमएमआरडीए अधिकाऱ्यांनीही माननीय मुख्यमंत्र्यांना केली असून लोकार्पण करण्यासाठी वेळ देण्याची विनंती केली आहे. मुख्यमंत्र्यांनी लवकरच लोकार्पणाची वेळ दिली तर त्यांच्याच हस्ते लोकार्पण होईल. पण जर वेळ मिळाली नाही तर मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने याच महिन्यात उड्डाणपुलाचे काम पूर्ण होताच लोकार्पण करून उड्डाणपूल नागरिकांसाठी स्थानिक आमदार - खासदार - लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत खुला केला जाईल, असेही आमदार सरनाईक यांनी सांगितले. उड्डाणपुलावरील वाहन चालक , नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून राहिलेली सगळी कामे एका आठवड्यात पूर्ण केली जातील. याच महिन्यात हा उड्डाणपूल वाहनांसाठी कोणत्याही परिस्थितीत खुला होईल, असे आमदार सरनाईक यांनी सांगितले.

## डायघरसारख्या घटनेची पुनरावृत्ती नको

नवी मुंबई : डायघर पोलीस ठाणे हद्दीत असणाऱ्या एका मंदिर परिसरात नवी मुंबईतील विवाहित महिलेवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. नवी मुंबईतही अनेक निर्जन वा अत्यल्प वर्दळीची ठिकाणे आहेत. डायघरसारखी घटना नवी मुंबईत होऊ नये म्हणून उपाययोजना करण्यात याव्यात तसेच डायघर मधील घडलेल्या प्रकरणी दोषींना कठोर शिक्षा करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संघटनेने केली आहे.

घरगुती भांडणातून बेपत्ता झालेल्या बेलापूर मधील महिलेवर तीन पुजाऱ्यांनी कल्याण शिळफाटा येथील घोल मंदिर परिसरामध्ये सामूहिक बलात्कार केल्यानंतर आरोपीने तिच्या डोक्यात वार करून आणि गळा दाबून तिची निर्घृण हत्या केली. या घटनेत तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. खटला जलद गतीने चालवण्यात येऊन आरोपींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी या अनुषंगाने कारवाई करावी, असे निवेदन शिवसेना ठाकरे गटाने नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना दिले. तसेच अशी घटना नवी मुंबईत घडू नये म्हणून उपाययोजना सुचवल्या आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष विठ्ठल मोरे, शहर, उपाध्यक्ष समीर बागवान, माजी नगरसेवक सोमनाथ वासकर आदि उपस्थित होते.

पिडीतेच्या सासरच्यांना शिक्षा करण्याची मागणी महिला संघटनांनी केली आहे. या मागणीसाठी उरणच्या गांधी चौकात महिलांनी निदर्शने केली. महिला संघटनांनी यावेळी पोलीस आयुक्तांना निवेदन दिले. या घटनेला अत्याचार व हत्या करणारे जबाबदार आहेत, त्याहीपेक्षा अधिक जबाबदार पिडीतेच्या सासरची मंडळी आहेत. त्यामुळे त्यांच्यावरही हत्येस जबाबदार म्हणून गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी हेमलता पाटील, सिमा घरत,रेखा घरत,नाहिदा शेख, हुसेनला शेख , ममता पाटील, सुजाता गायकवाड,अफ़शा मुकरी, अमिता ठाकूर, सविता पाटील तसेच अन्य कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# शेतकरी नोंदणीला ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ : अंकुश माने

ठाणे : नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, याकरिता येणाऱ्या प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण लाभणार आहे.

खरीप हंगाम २०२४ करीता शेतकरी नोंदणी करिता १५ जुलै अंतिम तारीख होती. आता ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये नियुक्त युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड तर, पालघर व रायगड जिल्ह्यामध्ये चोलामंडलम एम.एस.जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे.

ठाणे, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) - ५१ हजार ७६०. रत्नागिरी जिल्ह्यात भात पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. / हेक्टर) - ५० हजार.

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाचणी पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) - २० हजार.

पालघर जिल्ह्यात उडीद पीकासाठी विमा संरक्षित रक्कम (रु. /हेक्टर) - २५ हजार.

ई-पीक पहाणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. विविध जोखामिंतर्गत निश्चित होणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्तींच्या अधीन राहून निश्चित केली जाईल. भातासाठी केवळ १ रुपयात जवळजवळ ५० हजार पीक विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याकरिता योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.

# मुंब्र्याच्या ज्ञानदीप विद्यामंदिरात अवघी अवतरली पंढरी

मुंब्रा : समीर ज्ञानप्रसारक विश्वस्त निधी संचालित ज्ञानदीप विद्यामंदिर, मुंब्रा (मराठी माध्यम) व ज्ञानदीप कॉन्व्हेट स्कूल (इंग्रजी माध्यम) शाळेत दिंडी सोहळ्याच्या रूपाने अवघी पंढरीचं अवतरली होती. सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सतीश चं. देसाई सर, संस्थेचे सेक्रेटरी समीर चं. देसाई, संस्थेच्या उपाध्यक्षा शिवानी सरदेसाई, संस्थेच्या खजिनदार प्रविणा स. देसाई यांच्या हस्ते विठुरायाचे पूजन करून पालखी सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.

माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक वासुदेव बऱ्हाटे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका माधवी कदम, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी पालक सदस्य माजी विद्यार्थी उपस्थित होते. फुलांनी सजविलेल्या माऊलीच्या पालखीची ढोल, ताशा, लेझीमच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी महिलांनी आणि नागरीकांनी पालखीचे पूजन करून विठुरायाचे दर्शन घेतले. या दिंडी सोहळ्यात शाळेतील



विद्यार्थी वारकरी व पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन, पाण्याची बचत, आणि स्वच्छतेवर, आधारीत घोषवाक्यांचे फलक घेऊन जनजागृती केली. शाळेच्या मैदानात आरती करून सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. मुलांना खाऊचे वाटप करून अत्यंत भक्तीमय वातावरणात पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## हरविलेल्या मुलाचा शोध

ठाणे : अंश पप्पू गौड (वय १० वर्षे, रा. ओमसाई चाळ, मनोरमानगर, जीवन संग्राम मैदान जवळ, ठाणे (पश्चिम)) हा मुलगा हरविल्याची नोंद कापूरबावडी पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

हरवलेल्या इसमाचे वर्णन :- उंची ३ फूट २ इंच, रंग सावळा, नाक सरळ, डोळे काळे, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे लहान, अंगाने मध्यम, भाषा हिंदी व भोजपूरी बोलतो, अंगात नीळ्या रंगाची जीन्स पॅन्ट व लाल रंगाचा टी शर्ट, पायात स्लीपर चप्पल आहे.

वरील वर्णनाचा मुलगा जर कोणास आढळल्यास तर त्यांनी कापूरबावडी पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन कापूरबावडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सागर भोसले यांनी केले

### सिंगल यूज प्लास्टिक बंदी कारवाईत

## ८०३ किलो प्लास्टिक जप्त

ठाणे : ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील विविध प्रभागसमित्यांमध्ये गेल्या १५ दिवसांपासून सिंगल यूज प्लास्टिकबंदी मोहिम तीव्र स्वरुपात राबविण्यात येत आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रदुषण नियंत्रण विभाग, प्रभागसमितीमधील अतिक्रमण व निष्कासन विभागामार्फत सदरची कारवाई सुरू आहे. दिनांक १ ते १५ जुलै २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या सिंगल यूज प्लास्टिक बंदी मोहिमेत ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील एकूण १३९३ आस्थापनांना भेटी देण्यात आल्या असून या अंतर्गत एकूण



८०३.२६ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून त्यापोटी एकूण ४ लाख १ हजार ४०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळावा यासाठी सिंगल यूज प्लॅस्टिक बंदी कारवाई तीव्र स्वरुपात राबविण्यात येत असून विक्रेत्यांकडे असलेला प्लॅस्टिकचा साठा जप्त करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही महापालिका कार्यक्षेत्रात नियमित सुरू राहणार असून नागरिकांनी देखील सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करु नये असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.




जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत दि. १५ जुलै रोजी शिकाऊ उमेदवारी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यींना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सदिच्छा दिल्या. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते याच्या हस्ते उमेदवारांना निवड पत्र देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी ठाणे आयटीआय चे प्राचार्य स्मिता माने ,सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार विजय टिकोले, गंगाराम कर्पे, तसेच गटनिदेशक तृषांत मोटगरे, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार राजेश सोनवणे, निदेशक शर्वरी दुर्गुळे तसेच शिकाऊ उमेदवारी करिता निवड झालेले प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' १११ प्रभागांतील मदत केंद्रे तसेच २२६ अंगणवाड्यांमध्ये अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिलांनी 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यादृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याकरिता विविध माध्यमांतून योजनेची माहिती पात्र महिलांपर्यंत पोहचविण्यात येत आहे व त्यांच्याकडून योजनेचे अर्ज भरून घेण्याच्या कामास गती देण्यात येत आहे.

या योजनेचे महिलांकडून उत्स्फुर्त स्वागत करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयासह ८ विभाग कार्यालय क्षेत्रातील १११ प्रभागांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या मदत कक्षांना महिलांचा उत्साही प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या सोबतच शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या २२६ अंगणवाड्यांमध्येही तेथील अंगणवाडी सेविकांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू आहे. आत्तापर्यंत ६ हजारहून अधिक महिलांनी अर्ज दाखल केले असून ३१ ऑगस्ट अर्ज भरण्याची मुदत आहे.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यामार्फत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकडे बारकाईने लक्ष दिले जात असून सर्व पात्र महिलांपर्यंत योजनेची माहिती पोहोचली पाहिजे व एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

यासोबतच समाजविकास विभागाकडील समुह संघटक आपापल्या नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील महिला बचत गटांपर्यंत




पोहचून त्यांना योजनेची माहिती देत आहेत व त्यांचे अर्जही भरून घेत आहेत तसेच त्यांच्यामार्फत त्या परिसरातील इतर महिलांपर्यंत पोहचून त्यांचेही अर्ज भरून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या ४५० हून अधिक आशा वर्करही आपल्या कार्यक्षेत्रातील घरांपर्यंत पोहचून तेथील महिलांमध्ये योजनेविषयी जनजागृती करीत आहेत तसेच त्यामधील पात्र महिलांचे अर्जही भरून घेत आहेत. अशा विविध प्रकारे महिलांपर्यंत योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्यात येत आहे.

या योजनेचे ऑनलाईन अर्ज 'नारीशक्ती दूत' पवरुन भरले जात असून विहित नमुन्यात ऑफलाईन लेखी अर्जही दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. पात्र महिलांना अर्ज भरणा करणे सोयीचे व्हावे याकरिता या मदत कक्षांची वेळ दोन सत्रात सकाळी ८ ते दुपारी २ तसेच दुपारी २ ते रात्री ८ अशी ठेवण्यात आलेली असून हे मदत कक्ष आठवड्यातील सर्व सातही दिवस म्हणजे शनिवार व रविवार या कार्यालयीन सुट्टीच्या दिवशीही सुरु ठेवण्यात आले आहेत. १७ जुलै रोजी मोहरम व आषाढी एकादशी या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही मदत कक्ष सुरू असणार आहेत.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१